# प्रेस नोट

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत आज दि.०१.०९.२०२० रोजी रिक्त असलेल्या काही पदांवर अनुकंपा अंतर्गत अनुकंपा उमेदवारांना जेष्ठता व संबंधीत पदाची अर्हता विचारात घेवून नियुक्ती देण्याचे निश्चित केलेले आहे. यानुषंगाने संबंधीत उमेदवारांच्या शैक्षणिक तथा संबंधीत पदाला आवश्यक अर्हते संबंधीत कागदपत्रांची तपासणी यापूर्वीच करण्यात आलेली आहे.

कागदपत्र तपासणी केलेल्या उमेदवारांपैकी सबंधीत पदाचे अर्हतनुसार रिक्त असलेल्या पदांनुसार संबंधीतांची निवड करण्यात येत असुन त्या संबंधीची तात्पुरती निवड यादी जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर तथा जिल्हा परिषद, यवतमाळचे http://zpyavatmal.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्हा परिषद प्रशासनाचे काम हे पारदर्शी असल्यामुळेच अनुकंपा तत्वावर निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी ही प्रत्यक्षात प्रसिध्द करणारी यवतमाळ जिल्हा परिषद ही महाराष्ट्र राज्यात एकमेव आहे. त्यामुळे तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांनी कोणत्याही अफवेला किंवा प्रलोभनाला बळी न पडता निवड यादीबाबत काही आक्षेप किंवा कोणताही संशय असल्यास त्यांनी ७ दिवसांचे आंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे लेखी स्वरुपात सादर करावे किंवा प्रत्यक्षात भेटून समस्या मांडावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.)
जिल्हा परिषद,यवतमाळ

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी, यवतमाळ यांना माहीतीकरीता अग्रेषित. आपण सदर्हू प्रेस नोटची राज्यस्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या वर्तमान पत्रात प्रसिध्दी करण्याबाबत संबंधीत वर्तमानपत्राचे संपादकांना कळवावे.

02/08/2020